IndiaFirst
LIFE INSURANCE

**Publication: Tarankit** **Date: Wednesday, 26th November, 2014**

**Edition: Pune**

# इंडिया फर्स्ट इन्शुरन्स ५ कडून "हॅप्पी इंडिया" चे अनावरण

**मुंबई :** नावीन्यपूर्ण कल्पना आणि बदल घडवण्याची तीव्र इच्छा असलेल्या तरूण बदलकर्त्यांना सामावून घेण्यासाठी इंडियाफर्स्ट लाइफ इन्शुरन्सने ''हॅप्पी इंडिया'' - या सामाजिक बदलाच्या उपक्रमाचे आयोजन ११ ते १६ वर्षे वयोगटातील मुलांसाठी कंपनीच्या पाचव्या वर्धापनदिनाच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने केले आहे. या उपक्रमाची घोषणा कंपनीच्या पाचव्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात श्री. मोहित रोचनाली, चीफ मार्केटिंग ऑफिसर, इंडियाफर्स्ट लाइफ इन्शुरन्स यांनी केली.

या उपक्रमाच्या अनावरणाच्या निमित्ताने बोलताना श्री. मोहित रोचनाली म्हणाले की, ''आम्ही आमच्या सेवेची देशातील पाच वर्षे पूर्ण करत असताना हॅप्पी इंडियाची घोषणा करताना आम्हाला खूप आनंद होत आहे. भारतात बदलाचे वारे वाहू लागले आहेत. नवीन सरकार भारताला चांगले करण्यासाठी अनेक नवीन उपक्रम हाती घेत आहे- अगदी वित्तीय समावेशापासून ते 'मेक इन इंडिया' आणि 'स्वच्छ भारत अभियाना'पर्यंत. आता आपल्याकडे विद्यार्थ्यांना या बदलाचा भाग केवळ मागणी करुन नाही तर बदल घडवून होण्याची संधी देता येणार आहे.''

हॅप्पी इंडियाचे उद्दिष्ट तरुण बदलकर्त्यांना शोधण्याचे व त्यांच्या 'आयडियाज फॉर चेंज'ची अंमलबजावणी करण्यासाठी सहकार्य करण्याचे आहे. यात १५ शहरांमधील ५०० शाळांमधील २० हजारांपेक्षा जास्त विद्यार्थी सहभागी होणार आहेत.

तरूण मुले त्यांना खटकणारे सामाजिक प्रश्न पाहतील आणि हे प्रश्न सोडवण्याच्या त्यांच्या कल्पनांबाबत माहिती देतील. इंडियाफर्स्ट लाइफ त्यानंतर २५ सर्वोत्तम 'आयडियाज फॉर चेंज'ना प्रत्येकी ५० हजार रूपयांचे अनुदान देऊन या तरूण बदलकर्त्यांना त्यांच्या स्वप्नातील बदल घडवून आणण्यास सहकार्य देतील.

या उपक्रमाला बँक ऑफ बडोदा आणि आंध्र बँकेने सहकार्य केले असून त्याची वैधता आणि प्रक्रिया प्रमाणीकरणाची जबाबदारी केपीएमजी या ज्ञान भागिदारांनी घेतली आहे.

''आमचे प्रयत्न भारताच्या भावी पिढीला कार्यक्षमतेने राष्ट्रउभारणीत सहभागी करुन घेण्याचे आहेत. आम्हाला आशा आहे की, इंडियाफर्स्टच्या छोट्या पावलामुळे देशात एक मोठे पाऊल उचलले जाईल आणि शेकडो शाळा त्यात सहभागी होतील,'' असे मत श्री. रोचनाली यांनी व्यक्त केले. या सर्वोत्तम २५ बदलाच्या कल्पनांना उद्योगातील दिग्गजांकडून मार्गदर्शन केले जाईल - नवप्रवर्तक, सामाजिक अभ्यासकर्ते व लेखक या संपूर्ण अंमलबजावणीच्या टप्प्यात सहभागी होतील आणि त्यात प्रमोद लेले, मुख्य कार्यकारी अधिकारी, हिंदुजा हॉस्पिटल आणि तमल बंदोपाध्याय, वरिष्ठ संपादक, एचटी मीडिया यांच्यासारख्या मोठया नावांचा समावेश आहे.

इंडियाफर्स्टकडून फेब्रुवारी महिन्यात एका हॅप्पी इंडिया राष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले जाईल. त्यात २५ संघ आपले प्रकल्प कॉर्पोरेट उद्योगसमूह, महत्त्वाची सामाजिक व्यक्तिमत्त्वे आणि मीडियासमोर सादर करतील. या विद्यार्थ्यांचे प्रयत्न इंडियाफर्स्ट आणि सृष्टी पब्लिशर्स यांनी संयुक्तरित्या काढलेल्या 'यंग चेंज मेकर्स' या पुस्तिकेत प्रकाशित करण्यात येतील. या पुस्तिकेत मार्गदर्शकाचे या कल्पनेबाबतचे मतही व्यक्त केलेले असेल. जसे, त्याचे अंमलबजावणीनंतरचे परिणाम आणि ही कल्पना आनंदी भारताच्या निर्मितीसाठी कशी वापरता येईल.